# औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
## महानगरपालिका, औरंगाबाद

जा.क्र.मनपा/आरोग्य/एनएचएम/ ३ /२०१९ दिनांक :- 4/ 1 /२०१९

## अल्पमुदतीची दरपत्रक सुचना

औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरंगाबाद, अतर्गत सीपीएमयु युनिट, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमाकरिता इनोव्हा/ स्विफट डिझायर/स्कॉरपिओ इत्यादीपैकी सुस्थितीतील मेक मॉडल एक (०१) वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. सदरील वाहन ३ वर्षापक्षा जुने असु नये. याकरिता नोंदणीकृत वाहनधारक / कंत्राटदार एजन्सीकडुन अल्पमुदतीची दरपत्रक सुचनेव्दारे दोन लिफाफा पध्दतीने दिनांक:- 14/ 1 /२०१९ पर्यत अल्प मुदतीची दरपत्रक सुचना मागविण्यात येत आहे.

### दरपत्रक भरण्यासाठी कार्यपध्दती :-

तांत्रिक निवीदेमध्ये कुठल्याही प्रकारचे दर नमुद करु नये. नसता निवीदा रद्द करण्यात येईल. सर्व प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. ज्या निवीदाधारकांचे निविदेतील अटी व शर्ती पुर्ण केलेल्या असतील त्याच निवीदा धारकांचे व्यावसायीक दरपत्रक उघडण्यात येईल. याबाबत औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरंगाबाद कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील. निविदा उघडण्याचा वेळेस निवीदाधारक उपस्थीत राहु शकतील.

### अ) तांत्रिक निविदा :-

१. फर्म/एजन्सीचे /संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. पत्ता
३. मोबाईल क्रमांक
४. एजन्सीच्या नावाचे पॅन कार्ड सत्यप्रत
५. वाहन पुरवठा करण्याबाबत अनुभव प्रमाणपत्र
६. पुर्ण निविदा सर्व माहितीसह एजन्सीच्या अधिकृत व्यक्तीने शिक्का व स्वाक्षरी करावी. (तांत्रिक निवीदेमध्ये दर भरण्यातयेउ नये)
७. वाहणाची कागपत्र, विमा प्रमाणपत्र
८. ईमडी रु.५०००/- Aurangabad City Urban Health Society, Municipal Corporation Aurangaba यानांवे राष्ट्रीयकृत बॅकेचा डीडी फक्त.
९. कंत्राटदार यांनी वाहन मालकाकडुन ना-हरकत प्रमाणपत्र ई-निविदा प्रसिध्द झाल्यानंतर रु.१००/- बॉण्ड पेपरवर द्यावे लागेल.

ब ) व्यावसायिक दरपत्रक :-

व्यावसायिक दरपत्रक शेडयुल-1 मध्ये दर भरण्यात यावे.

**दरपत्रक प्रक्रियेने वाहन भाडे तत्वावर घेण्यासाटी खालील अटी व शर्ती :-**

1. Air Condition असलेल्या वाहनाची उपलब्ध करुन द्यावी लागेल.
2. वाहन प्रतिमाह 1800 कि.मी. चालेल अतिरिक्त कि.मी. चे दरपत्रक स्वतंत्रपणे देण्यात यावे.
3. नियमाप्रमाणे टॅक्सीची आकारणी करुन देयकातून कपात करण्यात येईल.
4. इंधन, वंगण, दुरुस्ती, वाहन चालकाचे वेतन, टोल भाडे इ. ची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.
5. वाहन 3 वर्षापेक्षा जून असू नये.
6. वाहनांची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे, तसेच सदरहू वाहनाऐवजी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची राहील. याकरिता अतिरिक्त दर दिले जाणार नाही.
7. वाहनाचा कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकावर राहील. याकरिता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाकडून कोणत्याही प्रकारचा निधी मिळणार नाही.
8. भाडयाने दिलेले वाहन नादुरुस्त झाल्यास मालकाने पर्यायी वाहन उपलब्ध करुन न दिल्यास या कार्यालयाकडून दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन घेण्यात येऊन त्याचे भाडे संबंधित नादुरुस्त झालेल्या वाहनाच्या मालकाकडून बाजार भावाच्या दराने जे प्रती दिवस दर देण्यात येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे देयकातून भाडे कपता करण्यात येईल.
9. वाहनधारकाने प्रत्येक महिन्यात फिरती केलेल्या लॉगबुकची सत्यप्रत्य सदस्य सचिव तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या स्वाक्षरीसह अहवाल सादर केल्याशिवाय भाडे अदा करण्यात येणार नाही.
10. शासकीय, निमशासकीय सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या नावावर वाहन असल्यास निविदा प्रक्रियेमध्ये त्यांच्या वाहनाचा विचार केला जाणार नाही.

११. वाहन पुरवठादारास औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरंगाबाद यांच्याशी करार करणे आवश्यक आहे.

१२. वाहनचालकाकडे अधिकृत वाहन परवाना(Valid Motor Licenses) असावा.

१३. वाहनावर राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा Logo असणे आवश्यक आहे.

१४. वाहन तसेच वाहन चालक वेळेवर उपलब्ध नसने, वारंवार दुरुस्ती असणे, वाहन चालकाचे गैरवर्तन इत्यादी कारणांसाठी दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१५. दरपत्रकाच्या शर्ती व अटीचे पालन न केल्यास पुर्व सुचना न देता दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१६. अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरी अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१७. सदर वाहन केवळ १० महिण्याकरीता भाडेतत्वावर घेण्यात येत आहे.

## Schedule - I

### व्यावसायिक निविदा (Commercial Bid)

मी / आम्ही ------------------------------------------------------------ नोंदणीकृत एजन्सी / संस्था / कंत्राटदार निविदा पुस्तिकेतील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे अवलोकन केलेले असून त्या सर्व मला / आम्हाला मान्य असून मी / आम्ही इनोव्हा, स्विफ्ट डियाझर, स्कॉर्पिओ यापैकी एक वाहनाचा पुरवठा करण्यासाठी खालील प्रमाणे दर सादर करत आहे /आहोत.

| अ.क्रं. | तपशील | दर |
|---|---|---|
| 01 | इनोव्हा / स्विफ्ट डिझायर/ स्कॉरपिआ यापैकी एक वाहनाचा पुरवठा करणे. | वाहन चालक, इंधनासह 1800 कि.मी., टोल चार्ज व भत्तासह रु.<br>(अक्षरी रुपये ------------------------------------<br>प्रतिमाह व त्यापुढील प्रति कि.मी करिता रु.<br>(रुपये ------------------------------) इतके दर सादर करण्यात येत आहे. |

दिनांक :-
ठिकाण :-

स्वाक्षरी व शिक्का
एजन्सी

सदस्य सचिव
तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी